# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०४/०९/२०१८

## *निहायकल जंगल परीसरात पोलीस नक्षल चकमक*

धानोरा उपविभागांतर्गत येणाऱ्या पोमके- गॅरापत्ती येथील मौजा- निहायकल जंगल परीसरात आज दिनांक- ०४/०९/२०१८ सकाळी १०.०० ते १०.३० वा. च्या सुमारास सी-६० चे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दबा धरुन बसलेल्या बंदुकधारी नक्षलवादयांनी पोलीसांना जिवे मारण्याच्या उद्देशाने पोलीसांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरु केला. पोलीसांनीही आत्मसंरक्षणार्थ व प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळ काढला. यानंतर पोलीसांनी सदर ठिकाणी शोध मोहिम राबविली असता. यामध्ये एक हत्यार,इलेक्ट्रानिक साहीत्य,पिट्टू, मेडीसीन व दैनंदिन वापराच्या वस्तु असे मोठया प्रमाणावर नक्षल साहित्य मिळून आले. यानंतर सदर परिसरात नक्षल विरोधी अभियान तिव्र करण्यात आले आहे.